# पुणे पत्रकार सहकारी गृहरचना संस्था (मर्यादित)

रजि.नं.पी.एन.ए /६५८ /३१.०१.१९७१

कार्यालय : सिंधू,पत्रकार नगर,पुणे ४११०१६

दि . १० मे २०२२

## विशेष सर्व साधारण सभा

दि.२९ मे २०२२

श्री.............................................................................................

सप्रेम नमस्कार,

पुणे पत्रकार सहकारी गृहरचना संस्था (मर्यादित) या आपल्या संस्थेची विशेष सर्व साधारण सभा रविवार, दि.२९ मे २०२२ रोजी सायंकाळी ६ वाजता मधुकर जोशी सभागृह (समाज मंदिर) येथे आयोजित करण्यात आली आहे.

## सभेची कार्यक्रम पत्रिका

१)काही सभासदांनी दि. ३ मे २०२२ रोजी लेखी पत्राव्दारे “पुनर्निर्माण बांधकाम समिती” नेमण्याची मागणी केली आहे त्यावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे

## महत्त्वाची सूचना

या सभेसाठी फक्त सभासदांना उपस्थित रहाता येईल

विनायक पटवर्धन

सेक्रेटरी

रजि.नं. पी.एन.ए./एच.एस.जी./६५८/३१-१-१९७१
पुणे पत्रकार सहकारी गृहरचना संस्था (मर्यादित)
कार्यालय : पत्रकारनगर, सिंधू इमारत, पुणे ४११ ०१६.

दि. ३१.०५.२०२२

**२९ मे २०२२ रोजी झालेल्या विशेष सर्व साधारण सभेच्या कामकाजाचे इतिवृत्त**

सप्रेम नमस्कार,

पुणे पत्रकार सहकारी गृहरचना संस्था या आपल्या संस्थेची विशेष सर्व साधारण सभा दि.२९ मे २०२२ रोजी सायंकाळी ६ वाजता मधुकर जोशी सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या सभेस ५६ सभासद उपस्थित होते. संस्थेच्या नियोजित पुनर्निर्माण योजनेसाठी बांधकाम समिती स्थापन करण्याचा विचार करण्यासाठी विशेष सर्व साधारण सभेचे आयोजन करण्यात यावे अशी मागणी ३७ सभासदांनी दि. ३ मे २०२२ रोजीच्या पत्रानुसार केल्याने नियमानुसार ही विशेष सर्व साधारण सभा आयोजित करण्यात आली होती.सभेची नोटीस सभासदांना दि. १० मे २०२२ रोजी पाठविण्यात आली होती.

सभेच्या अध्यक्षस्थानी ॲड.विजय सावंत होते.आपल्या प्रास्ताविकात त्यांनी बांधकाम समिती स्थापन करण्या बद्दल शासनाचे पुनर्निर्माणा सबंधीचे आदेश व कायदेशीर तरतुदी यांची माहिती दिली. विशेष सर्व साधारण सभेची मागणी करणाऱ्या ३७ सभासदांचे प्रतिनिधी म्हणून विषयाची प्राथमिक मांडणी श्री अरविंद करंदीकर यांनी करावी व नंतर विषय चर्चेसाठी सर्व साधारण सभेसमोर ठेवावा असे त्यांनी सुचविले त्यानुसार करंदीकर यानी विषय सभेसमोर मांडला. बाधकाम समितीची मागणी करण्यामागील कल्पना,तिचे स्वरुप,समिती करु शकणारी कामे,कामाची गुणवत्ता सुधारण्यासाठी होऊ शकणारी मदत या मुद्यांवर सभेत चर्चा झाली.बांधकाम समिती नेमायची झाल्यास तिचे स्वरुप सल्लागार असे असावे.अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार

पंचसमितीचाच असावा असे मत प्रस्तावास पाठींबा देणाऱ्या बहुसंख्य सभासदांनी व्यक्त केले. सर्वश्री मोरेश्वर जोशी,शशांक गोखले,जयराम देसाई,अभिजित वारघडे,किरण ठाकूर, राजाराम जोशी व अजय डोंगरे यांनी प्रस्तावाच्या बाजूने आपली मते व्यक्त केली.

सध्याची पंच समिती पुनर्निर्माणासाठी आवश्यक असणारे काम समाधानकारक पध्दतीने करीत आहे, पंच समितीवर विशेष सर्वसाधारण सभेने वेळोवेळी आपला विश्वास व्यक्त केला आहे, बांधकाम समितीच्या स्थापनेने दुहेरी सत्ता केंद्र निर्माण होऊन कामास उपयुक्त ठरण्याऐवजी अडचणीचे होण्याचा धोका आहे, जी गोष्ट कायद्याने निश्चित केलेली नाही व ज्याची कार्यपध्दती निश्चित नाही ती करण्याचा प्रयत्न आपण केला तर वेळप्रसंगी तो संस्थेस अडचणीचा ठरु शकतो, बांधकाम समितीचे स्वरुप फक्त सल्लागार असे असेल तर समिती स्थापन करण्याऐवजी पंचसमितीस आवश्यक वाटेल त्यावेळी सक्षम सभासदांचा सल्ला घ्यावा, एखाद्या विषयातील माहितगार सभासदात उपलब्ध नसेल तर बाहेरील सल्लागाराची सेवा आवश्यक तर त्यांची फी देऊन घेण्याचा पर्याय उपलब्ध ठेवावा, असे मत प्रस्तावास विरोध करणाऱ्या सभासदांनी व्यक्त केले.सर्वश्री चंद्रशेखर कारखानीस,श्रीवर्धन गाडगीळ, रोहन मोरे, अनिल टाकळकर, प्रदिप नेवाळकर,विजय सरदेशपांडे, अनंत बेदरकर, महेश प्रभुदेसाई, अनंत शालिग्राम, वसंत जोगदेव व विजय लेले यांनी प्रस्तावाच्या विरोधी बाजूने मत व्यक्त केले.

चर्चेनंतर सदर विषयावरील ठराव सभासदांनी सभेसमोर मांडावा अशी सूचना अध्यक्षांनी केली त्या नुसार अजय डोंगरे यांनी स्वहस्ताक्षरात ठरावाचा मसुदा लिहून तो सूचक अरविंद करंदीकर व अनुमोदक शशांक गोखले यांच्या स्वाक्षऱ्यांसह सभेस सादर केला.दुसरा ठराव श्रीवर्धन गाडगीळ व वसंत जोगदेव यांनी सादर केला.तो अगोदर सादर करण्यात आला होता.पण आमचाच ठराव आधी विचारासाठी घेण्यात यावा असा आग्रह अजय डोंगरे, अरविंद करंदीकर, शशांक गोखले यांनी धरल्यानंतर अध्यक्षांनी तो ठराव आधी मतदानास घेण्याचा निर्णय दिला त्यानुसार ठरावाबर मतदान घेण्यात आले त्यात ठरावाचे बाजूने १४ आणि विरोधी ४२ मते पडल्याने ठराव नामंजूर झाला.पाठोपाठ श्रीवर्धन गाडगीळ व वसंत जोगदेव यांचा ठराव मतदानास टाकण्यात आला त्यास कोणीही विरोध न केल्याने तो ५६ विरुध्द ० अशा मताने मंजूर करण्यात आला.एकाच विषयावरील दोन ठराव एकाच सभेत होणे योग्य होणार नाही असे मत सभेने व्यक्त केल्याने ठराव मागे घेण्याची विनंती श्रीवर्धन गाडगीळ व वसंत जोगदेव यांना

करण्यात आली त्या नुसार त्यांनी तो ठराव मागे घेऊन सर्व साधारण सभेस सहकार्य केले.

**ठराव १**

आज दि.२९.०५.२०२२ रोजी ठराव माडतो की बांधकाम समिती / अभ्यास समिती ठराविक सदस्यांची करुन सदरील समिती ही सध्याच्या पंच कमिटीस सहाय्य करतील ( सूचक अरविंद करंदीकर व अनुमोदक शशांक गोखले )

वरील ठराव १४ विरुध्द ४२ मतांनी नामंजूर करण्यात आला.

**ठराव २**

सध्याच्या पंच समितीनेच नियोजित पुनर्निर्माणाचे काम करावे,स्वतंत्र बांधकाम समिती नेमू नये, आवश्यक त्या वेळी योग्य त्या सभासदांचा सल्ला घ्यावा तसा तो सभासदामधून उपलब्ध नसेल तर बाहेरील सल्लागाराची सेवा योग्य ती फी देऊन घेण्यात यावी.

(सूचक श्रीवर्धन गाडगीळ व अनुमोदक वसंत जोगदेव)

वरील क्रमांक २ चा ठराव ५६ विरुध्द ० मतांनी मंजूर करण्यात आला.मात्र सभेच्या विनंतीस मान देऊन ठराव सादरकर्त्यांनी तो परत घेतल्याने तो सभेच्या अधिकृत कामकाजात समाविष्ट करण्यात आलेला नाही मात्र त्यात व्यक्त करण्यात आलेल्या मुद्यांची नोद विशेष सर्व साधारण सभेने घेतली आहे.

वरील ठराव मंजूर करण्यात आल्यावर सर्वाचे आभार मानून सभा संपल्याचे अध्यक्षांनी जाहिर केले.

पुणे पत्रकार सहकारी गृहरचना संस्था करीता,

सेक्रेटरी

पत्रकारनगर समाज मंदिर
रजि. नं. PNA / HSG / ६५८ ता. ३०-९-१९६९
पत्रकारनगर, पुणे-४११ ०१६.